महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.७१/पदभरती/का-४** **दि.२०-०४-२०२३**

## परिपत्रक क्र.४

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील विविध ७७२ पदे भरण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दि.१६/०२/२०२३ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती.

जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज केलेल्या उमेदवारांची सामायिक परीक्षा (CBT/CBT-१) **रविवार दिनांक १६/०४/२०२३** रोजी घेण्यात आली. सदर परीक्षेची उत्तरतालिका (Answer key) उमेदवारांच्या लॉगीन मध्ये उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे.

सदर उत्तरतालिका संदर्भात उमेदवारांना हरकती (objections) सादर करावयाच्या असल्यास जाहिरातीमधील अ.क्र.१८.१३ मध्ये नमूद तरतुदीनुसार उमेदवारांनी दिनांक २०/०४/२०२३ ते २३/०४/२०२३ या कालावधीत स्वत:च्या लॉगीन मधून प्रश्नांसंबंधित हरकती आवश्यक अभिलेख्यासह (alongwith documents) विहित आक्षेप हाताळणी शुल्क (विनापरतावा) (Objection handling fees-Non refundable) अदा करुन ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात.

विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील, अन्य कोणत्याही मार्गाने / पध्दतीने तसेच विहित कालावधीनंतर सादर केलेल्या हरकती कोणत्याही परिस्थितीत स्विकारल्या जाणार नाहीत. विहित कालावधीत प्राप्त झालेल्या हरकतींचीच दखल घेतली जाईल. तरी संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

**Login Link :** https://cdn3.digialm.com//EForms/configuredHtml/32330/81005/login.html

स्वाक्षरीत/-

( दि. अं. दळवी )

संचालक,

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.